www.sgbauonline.com

**AU–1931**

# B.A. (Part–II) Examination

## (Modern Indian Language)

## MARATHI (Compulsory)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 70

**नोट :** सर्व प्रश्न सोडवा.

1. 'अखेरचे कीर्तन' या पाठातील संत गाडगे बाबांचे समाज सुधारणा आणि लोकशिक्षण या संदर्भातील विचार सविस्तर स्पष्ट करा. 12

**किंवा**

स्त्रियांचे वैधव्य व पुनर्विवाह यासंबंधी 'स्त्री–पुरुष तुलना' या वैचारिक पाठातील ताराबाई शिंदे यांचे विचार विशद करा.

2. 'बुद्धीचा महिमा' या लेखातील साने गुरुजींचे विचार थोडक्यात लिहा. 8

**किंवा**

'जीवनाच्या सुगंधी मिठीसाठी' या वैचारिक पाठातून बाबा आमटे यांनी तरुणांकडून कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे, ते संक्षिप्त स्वरूपात लिहा.

3. 'एका साध्या सत्यासाठी' या पाठातून लेखक चंद्रकांत वानखडे यांनी कोणते चिंतनपर सत्य प्रकट केले आहे, ते विस्ताराने लिहा. 12

**किंवा**

ना.धो. महानोरांनी शेतकऱ्यांच्या मनातील अस्वस्थता 'बरस रे राजा, रोज बरस स्वातीला' या पाठातून कशी प्रकट होते ते सविस्तर स्पष्ट करा.

4. 'आज्ञापत्र' या पाठातून शिवाजी महाराजांचे वृक्षप्रेम आणि वृक्ष संवर्धनाची दूरदृष्टी कशी व्यक्त होते, ते संक्षिप्त स्वरूपात लिहा. 8

**किंवा**

'मातीचे धन' या नामदेव कांबले यांच्या कथेचा आशय थोडक्यात स्पष्ट करा.

5. 'जमाखर्च स्वातंत्र्याचा' या कवितेतून स्वातंत्र्योत्तर कालखंडा बाबतची कवी मंगेश पाडगावकर यांच्या मनातील खंत कशी व्यक्त झाली आहे, ते सविस्तर स्पष्ट करा. 12

**किंवा**

'दंगल शांततेत पार पडली' या कवितेतून कवी लोकनाथ यशवंत यांनी दंगलीचे कोणते विदारक वास्तव उपरोधपूर्ण शैलीतून व्यक्त केले आहे, ते सविस्तर स्पष्ट करा.



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

6. 'पाठराखी' या पां.श्रा.गोरे यांच्या कवितेचे आशयसौंदर्य थोडक्यात स्पष्ट करा. 8

किंवा

'घेता' या विंदा करंदीकर यांच्या कवितेचा आशय स्पष्ट करा.

7. खालील 'अ' आणि 'ब' मधील पत्राचे नमूने तयार करा :

(अ) धनवटे महाविद्यालय, नागपूर येथे ग्रंथालयासाठी 'सुलभ मराठी व्याकरण' आणि 'व्यावहारिक मराठी लेखन' या दोन पुस्तकांची मागणी करणारे पत्र विमल प्रकाशन, मुंबई यांना कु. प्रिया काळे या नावाने लिहा. 5

किंवा

सांडपाण्याचे नीट व्यवस्थापन नसल्याने राजराजेश्वर नगर, यवतमाळ येथे घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे, तरी सौ. कावेरी देशमुख, यवतमाळ या नावाने तक्रार करणारे पत्र नगर परिषद, यवतमाळ या कार्यालयाला लिहा.

(ब) राज्यस्तरीय मराठी साहित्य संशोधन परिषदेत अभ्यासपूर्ण निबंध सादर केल्याबद्दल डॉ. रमेश जाधव कोल्हापूर, यांचे अभिनंदन करणारे पत्र डॉ. शैलेन्द्र राऊत, अमरावती या नावाने लिहा. 5

किंवा

जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा येथील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक महोत्सवाला मा. कुलगुरु साहेबांनी उद्घाटक म्हणून उपस्थिती दर्शविली. त्याबद्दल आभार व्यक्त करणारे पत्र प्राचार्य अजय सोनारकर, बुलडाणा या नावाने लिहा.



www.sgbauonline.com